# जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

## (महसूल शाखा)

दुरध्वनी क्र.0241-2346028 E-Mail → collectornagar@gmail.com फॅक्स क्र.0241-2343602

क्र/मह/कार्या/आस्था-5ड/७५८ /2019 दिनांक: 08/04/2019

**कालमर्यादा / परीक्षा प्राधान्यः**

**प्रति,**

**उपविभागीय अधिकारी** - नगर / श्रीरामपुर / शिर्डी / संगमनेर / कर्जत/श्रीगोंदा/पाथर्डी

**तहसिलदार** - नगर / नेवासा / श्रीरामपुर / राहुरी / राहाता / कोपरगांव / संगमनेर

अकोले / कर्जत / जामखेड / श्रीगोंदा / पारनेर / पाथर्डी / शेवगांव

**शाखा प्रमुख (सर्व)** - -----------------------,जिल्हाधिकारी कार्यालय, अ.नगर

**<u>विषयः</u>- <u>महाराष्ट्र महसूल अर्हता परीक्षा मे-2019</u>**

लिपीक-टंकलेखक संवर्गातून अव्वल कारकुन पदावरील पदोन्नतीसाठी

आणि तलाठी संवर्गातून मंडळाधिकारी पदावरील पदोन्नतीसाठी.

**<u>संदर्भः</u>**- मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे परिपत्रक क्र.मशा/कार्या.1 /आस्था.5/14014/2019 जा.क्र.5266, दि.05.04.2019

विषयांकित परीक्षा दिनांक 14.05.2019 ते 17.05.2019 या कालावधीत नाशिक मुख्यालयाच्या ठिकाणी डी.डी.बिटको बॉईज हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, नाशिक या ठिकाणी आयोजित करण्यात आली असलेबाबत संदर्भिय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे. सोबत संदर्भिय परिपत्रकाची व त्यालगत परीक्षेच्या वेळापत्रकाची छायांकित प्रत जोडली आहे. परिपत्रकात दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

परीक्षेस बसु इच्छिणारे पात्र कर्मचारी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी. सदर परीक्षा कार्यक्रम आपले कार्यालयात तात्काळ प्रसिध्द करण्यात येवून लिपीक व तलाठी कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देण्यात यावा व याबाबत कोणाचीही तक्रार येणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.

विषयांकित परीक्षेस बसु इच्छिणा-या कर्मचा-यांकडून परिशिष्ट-ब (महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील राजपत्र दिनांक 4 जून, 1998 (तलाठी संवर्गासाठी) आणि राजपत्र दिनांक 7 जुलै, 1999 (लिपीक संवर्गासाठी) मधील विहित नमुन्यात अर्ज (अर्जदारांचे आवेदनपत्र) **<u>तीन</u>** प्रतीत प्राप्त करुन घ्यावेत आणि इच्छुक कर्मचा-यांना परीक्षेस बसण्यास परवानगी देण्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव (तलाठी व लिपीक वर्गीय स्वतंत्र) परिपूर्ण माहितीसह व उमेदवारांचे विहित नमुन्यातील अर्जासह (अर्जदाराचे आवेदनपत्रासह) सोबत दिलेल्या प्रपत्रातील (प्रपत्र अ, ब) परिपुर्ण माहिती भरुन **<u>दिनांक 16.04.2019</u>** पुर्वी महसूल शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे खास दुतामार्फत **<u>तीन</u>** प्रतीत सादर करावी. अर्जदार यांचे आवेदनपत्रासह प्रस्तुतची माहिती परिपुर्ण न पाठविल्यास परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. अर्जदार यांची सधी वाया गेल्यास संपुर्ण जबाबदारी कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांची असेल. परिक्षार्थींची यादी सादर करताना सदर यादी ही परिक्षार्थींच्या आडनावाच्या मराठी मुळाक्षराच्या अनुक्रमानुसार तयार करुन पाठवावी. तसेच परिक्षार्थींनी या पूर्वी किती संधी घेतल्या आहेत त्यांत सुट मिळालेल्या पेपरबाबत सुस्पष्ट खुलासा घेऊन परिक्षार्थींचा संधी क्रमांक अचूक कळविण्यात यावा. त्याचप्रमाणे, अपंग परिक्षार्थी असल्यास त्याबाबत प्रस्तावात स्पष्टपणे उल्लेख करुन लेखनिक / मदतनीस पाहिजे असलेबाबत अगोदरच कळविणेत यावे.

उक्त नमुद दिलेल्या सुचनेप्रमाणे संपूर्ण कार्यवाही करण्यात यावी व सदरची माहिती विहीत मुदतीत सादर न केल्यास अथचा चुकीची माहिती सादर केल्यास मा.विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांचे कार्यालयामार्फत परीक्षार्थींना परीक्षेस बसण्याची परवानगी नाकारण्यात येईल व त्यामुळे परीक्षार्थी कर्मचारी यांचे नुकसान झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**(सुधीर पाटील)**

**तहसिलदार महसूल,**

**जिल्हाधिकारी अहमदनगर करिता**

Scanned by CamScanner